शासन वि. रोहित

**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः गिरीश सुधाकर हिरवे,

वयः ५५ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः पनवेल. ता. पनवेल, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. जुलै २०२१ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधी दरम्यान मी अनशुल इनोव्हेटीव या कंपनीमध्ये उपव्यवस्थापक पदावर कार्यरत होतो. त्याठिकाणी मी जनरल मॅनेजर म्हणुन देखील कार्यरत होतो. आमचे कंपनीची कामाची वेळ सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५.३० अशी होती.

०२. दिनांक १५/०६/२०२३ चे रात्री १.४० वाजता आमचे कंपनीतील सिक्युरिटी सुपरवायझ श्री. रमाकांत शिंदे यांनी माझे मोबाईल फोनवर फोन करुन आपले कंपनीमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न झाला आहे, त्यापैकी एका व्यक्तीला त्यांनी पकडले आहे, तुम्ही ताबडतोब या असे मला सांगितले. त्यानंतर मी कंपनीमध्ये गेलो. त्यावेळी मला तेथील ४-५ गॅलवनाईझ् डम, प्लॅस्टीक डम व २०० लिटरचे बॅरल चोरी झालेल्या दिसल्या. सदर मुददेमाल कंपनीचे प्लट टचे मागच्या बाजुला ठेवलेला होता. मी कंपनीमधुन सदर व्यक्ती व सुरक्षारक्षक श्री शिंदे यांच्यासह पोलीस स्टेशनला गेलो. तेथे आम्ही सदर व्यक्तीला पोलीसांचे ताब्यात दिले. मी तेथे घटनेच्या अनुषंगाने फिर्याद दिली. त्यावर व छापील पहिली

खबर यावर माझे सळया असुन त्यातील मजकुर खराव बरोबर आहे. त्यांना **नि.क्र. १३ व १४** देण्यात येते.

०३. मी पोलीसांना ताब्यात दिलेल्या व्यक्तीचे नाव रोहीत मनोहर धोंडगे होते. मी त्याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर असुन आरोपीचे पिंज–यात बसलेला आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एम.डी. पाटील यांच्यामार्फत सुरू.**

०४. हे म्हणणे खरे आहे की, सुरक्षारक्षक श्री. शिंदे यांनी कंपनीमध्ये चोरी करणारे ३–४ लोक होते असे मला सांगितले होते, मी तक्रार ३–४ लोकांविरुध्द दिली होती, मी तक्रार दिल्यानंतर दि. १७/०६/२०२३ रोजी पोलीसांनी माझा पुरवणी जबाब घेतला, सदर जबाब देतेवेळी मी कंपनीमध्ये चोरी करण्याकरीता ३–४ लोक आले नसल्याचे सांगितले होते. आरोपीचे वकीलांनी साक्षीदाराचे पुरवणी जबाबामधील मजकुर रेफर केल्यामुळे सदर दस्तास निशाणी देण्यात येते. सदर दस्त **नि.क्र. १५** वर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुरक्षारक्षक शिंदे यांनी मला चुकीची माहिती दिली होती.

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझे कंपनीला खाजगी कंपनीकडुन सुरक्षारक्षक नेमलेले होते, गॅलवनाईझ डम व प्लॅस्टीक बॅरल आमचे कंपनीमध्ये तयार होत नाहीत, ते आम्हाला विकत आणावे लागतात, कंपनीने विकत घेतलेल्या प्रत्येक वस्तुची स्टॉक रजिस्टर मध्ये नोंद असते. हे म्हणणे खरे नाही की, आमचे कंपनीने सदरील डम व बॅरल कंपनीचे ताब्यात असल्याबाबत लेखी पुरावा पोलीसांना दिला नव्हता, सदरील वस्तु आमचे कंपनीचे बाहेर गेल्या

नव्हत्या. साक्षीदार पुन्हा सांगतो की, सदर वस्तु पैकी काही कंपनीच्या आत होत्या तर काही कंपनीच्या आवाराच्या बाहेर होत्या.

०६. हे म्हणणे खरे नाही की, सुरक्षारक्षक श्री. शिंदे यांनी ते कार्यक्षम आहेत हे दाखविण्याकरीता आरोपीने मुददेमाल चोरी केल्याचे मला खोटे सांगितले होते, मला सुरक्षारक्ष्ज्ञकांनी खोटी माहिती दिली होती, आमचे कंपनीमधुन मुददेमाल चोरीला गेला नव्हता, आरोपी मोक्यावर मिळुन आला नव्हता, मी पोलीस स्टेशनला खोटी तक्रार दिली व आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.07.04 15:30:09 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि. ०४.०७.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.